जा.क्र./ताआअकामा/NHM//UHWC दरपत्रक/926 /2026
तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय मालवण
तालुका मालवण जिल्हा.सिंधुदुर्ग
दिनांक -21 /09/2026

# दरपत्रक मागणी नोटीस

सन 2026 - 2027 या आर्थिक वर्षासाठी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, मालवण येथे नागरिकांना कार्यालयामार्फत उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सेवा, सेवांचा कालावधी, संबंधित अधिकारी/कर्मचारी, संपर्क क्रमांक, नागरिकांच्या अपेक्षा व तक्रार निवारण याबाबतची माहिती दर्शविण्यासाठी "नागरिकांची सनद" कार्यालयीन बोर्ड तयार करून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे कामाकरिता इच्छुक पात्र संस्था/मक्तेदार/फर्म यांचेकडून बंद लखोट्यात दरपत्रक/निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | प्रमाण | दर |
|---|---|---|---|
| 1 | नागरिकांची सनद एक्रेलिक(Acrylic) बोर्ड तयार करणे व कार्यालयात बसविणे | 1 | प्रति स्के. फुट |
| 2 | बेकलाईट बोर्ड(एक्रेलिक(Acrylic) | 1 | |
| 3 | नेम प्लेट एक्रेलिक(Acrylic) | 1 | |
| 4 | प्लेक्स बोर्ड | 1 | |
| 5 | माहिती फलक एक्रेलिक(Acrylic) | 1 | |
| 6 | दिशादर्शक फलक | 1 | |

तरी इच्छुक दरपत्रक धारकांनी सदरची दरपत्रक नोटीस प्रसिध्द झालेपासून 7 दिवसांपर्यंत म्हणजेच दिनांक 29/09/2026 रोजी दुपारी 03.00 वाजेपर्यंत विहित नमून्यात परिपूर्ण दरपत्रक बंद लखोट्यातून या कार्यालयास समक्ष आणून अथवा डाक सेवाव्दारे सादर करावयाची आहेत. मुदतीत प्राप्त दरपत्रकांची छाननी करुन अटी व शर्तीपूर्ण झालेली दरपत्रके खोलून तुलनात्मक तक्त्याच्या आधारे किफायतशीर दरपत्रक धारकला पुढील आदेश देणेत येईल.

<u>दरपत्रकासाठी अटी व शर्ती :</u>

1. बोर्डचा आकार, साहित्य, डिझाईन व मजकूर कार्यालयाकडून निश्चित करण्यात येईल.
2. बोर्ड तयार करण्यापूर्वी त्याचा नमुना/डिझाईन कार्यालयाच्या मान्यतेसाठी सादर करावा.
3. बोर्डमध्ये मराठी भाषेतील मजकूर स्पष्ट, वाचनीय व आकर्षक पद्धतीने छापण्यात यावा.
4. बोर्ड तयार करणे, वाहतूक करणे व कार्यालयात योग्य पद्धतीने बसविणे यांचा सर्व खर्च सादर केलेल्या दरामध्ये समाविष्ट असावा.
5. निविदाधारकाने GST सहित/वगळून दर स्पष्टपणे नमूद करावा.
6. कामाचा दर्जा समाधानकारक नसल्यास संबंधित फर्म/मक्तेदारास आवश्यक दुरुस्ती करून द्यावी लागेल.
7. काम पूर्ण झाल्यानंतर कार्यालयाकडून तपासणी व समाधानकारक प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच देयक अदा करण्यात येईल.
8. सर्व कर व शासन नियमानुसार लागू असलेल्या कपाती करण्यात येतील.
9. सदर कामासाठी प्राप्त दरपत्रकांपैकी नियमानुसार योग्य व कमी दराच्या निविदेचा विचार करण्यात येईल.
10. निविदा स्वीकारणे अथवा कोणतीही निविदा नाकारण्याचा अधिकार तालुका आरोग्य अधिकारी, मालवण यांचेकडे राहील.

तालुका आरोग्य अधिकारी
तालुका मालवण

तालुका आरोग्य अधिकारी
तालुका मालवण

<u>दरपत्रक मागणी नोटीस लावण्याचे ठिकाण</u>

1) कार्यालयाचा नोटीस बोर्ड
2) www.nrhm.maharashtra.gov.in ,
3)www.arogya.maharashtra.gov.in